ISBN-978-93-84801-09-0



# ॥ गुरूवर्य ॥

गौरवग्रंथ

**सौ. करूणा शांताराम बुटे**
मुख्य संपादक तथा विश्वस्त


❋

**श्री दामोदर गोपाळराव कडू**
कार्यकारी संपादक तथा अध्यक्ष

❋

**श्री मनिष शांताराम बुटे**
प्रकाशक तथा उपाध्यक्ष

**सुनंदा प्रकाशन, अकोला (म. रा.)**



# आमचे सेवाभावी आचार्य ...



**प्रा. डॉ. दयाराम दुधाराम पवार**
शिक्षणशास्त्र विद्याशाखा-य.च.म.मु.वि, नाशिक
**सौ. रूपाली दयाराम पवार,** पीएच्. डी. संशोधक

प्राचार्य डॉ. शांताराम बुटे सरांना मी पुस्तकातून व वृत्तपत्रातून वाचले होते. तेव्हाच मला वाटले होते की आपण सरांना भेटावे, बोलावे, मार्गदर्शन घ्यावे. तसे माझे मूळगांव वाशिम मधील असल्यामुळे सर सुद्धा त्याच परिसरातले. जेव्हा मी पदव्युत्तर शिक्षण विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे २००६-०७ मध्ये एम. एड्. ला अध्ययनार्थी होतो तेव्हा मला सरांना भेटण्याचा प्रत्यक्ष योग आला. कारण होते एम. एड्. च्या शिक्षकांनी तेथे सुरू केलेली परंपरा. ती म्हणजे शिक्षण क्षेत्रातील नामवंत व्यक्तिंना आमंत्रित करून किंवा पीएच्. डी. मौखिक परीक्षेसाठी येणाऱ्या बहिस्थकांचे व्याख्याने, संवादसत्रे आयोजित करणे. त्यानिमित्ताने मी प्राचार्य डॉ. बुटे सरांना भेटलो. त्यांच्या सुंदर, स्वच्छ व्यक्तिमत्त्वासारखाच पांढरा पोषाख, चेहऱ्यावर स्मित हास्य, डोळ्यातून दिसणारा जीवनविषयक सकारात्मक दृष्टीकोन, कपाळावर टीळा, हातात डायरी असणारे प्राचार्य डॉ. शांताराम बुटे सरांना प्रथम मी पाहिले. सरांनी संत चोखामेळा यांच्या अभंगाने मार्गदर्शनाला सुरूवात केली ते शब्द

उस डोंगा परी, रस नव्हे डोंगा। काय भुललासी, वरलिया रंगा ॥

आणि बघता बघता सर्वजन मंत्रमूग्ध झाले. त्या दहा-पंधरा मिनिटांच्या मार्गदर्शनातून त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन, संत साहित्याचे वाचन, शिक्षणक्षेत्रातील कार्य, प्रशासकीय पदावरील कार्य, देहबोली, लकब, नि:स्वार्थपणे कार्य करण्याची हातोटी यांसारख्या विविध व्यक्तिमत्त्वातील पैलूंचा परिचय झाला. ते म्हणाले होते की माणसामाणसात भेदभाव न मानता आपण सर्व परमेश्वराची लेकरे आहोत. सर्व समान आहोत. स्त्री-पुरूष ह्याच केवळ दोन जाती आहेत. विनाकारण माणूस आपल्या अहंकाराचे श्रोत निर्माण करून मी इतरांपेक्षा कोणीतरी आहे असे दाखविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळेच तो इतरांपासून दूर

 ISBN-978-93-84801-09-0

जातो. त्यामुळे हा भेदाभेद करू नये असे सरांनी मार्गदर्शन केले. तेव्हा या विचारापुरतेच त्यांचे कार्य नाहीतर त्याला क्रियाशीलतेची जोड होती. त्यावेळी मी विद्यार्थी म्हणून समोर बसलेला असताना आपल्याला सरांच्या सान्निध्यात राहून शिकता येईल का? याचा विचार करत होतो आणि दुसऱ्याच वर्षी माझी पत्नी सौ. रूपाली पवार ही सुद्धा याच विभागात एम. एड्. शिकत होती. तेव्हा सुद्धा तिच्या संशोधन कार्याच्या मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक म्हणून प्राचार्य डॉ. बुटे सर आले होते. तेव्हापासून तर खऱ्या अर्थाने आम्हाला सरांकडे मार्गदर्शन घ्यावयाचेच आहे असे निश्चित वाटून गेले होते. म्हणतात ना मोठ्या गुरूंच्या सान्निध्यात येण्यासाठी निमित्त हवे असते ते आम्हाला मिळाले होते असे वाटते.

मी एम. एड्. झाल्यानंतर पुढच्यावर्षी पीएच्. डी. पूर्व परीक्षा प्रथमच अमरावती विद्यापीठाने सुरू केली होती व मी उत्तीर्ण झालो. नंतर मला संशोधक मार्गदर्शक म्हणून कोण निवडावे असा प्रश्न समोर आला तेव्हा क्षणक्षर ही न विचार करता आम्ही दोघांनी प्राचार्य डॉ. शांताराम बुटे सरांकडे संशोधन मार्गदर्शन घेण्याचे निश्चित केले. तेव्हा सर शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. पुढे सरांच्याच मार्गदर्शनाखाली मी शिक्षणशास्त्र विषयातील पीएच्. डी. संपादन केली.

मी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून रूजू झालो. तेव्हा मला सरांच्या मुक्त विद्यापीठातील कार्याचा परिचय झाला. कारण शिक्षणशास्त्र विद्याशाखेचा पूर्वीपासूनच संबंध होता. शिक्षणशास्त्र विद्याशाखेत विविध समित्यांवर तज्ज्ञ, मार्गदर्शक, सदस्य, अभ्यासकेंद्र संचालक म्हणून कार्य केले आहे. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यशाली समजतो की, मला डॉ. शांताराम बुटे सर एखादा शिक्षक एखाद्याला शिक्षणापासून ते नोकरीच्या ठिकाणापर्यंत जवळून अनुभवायला मिळाले.

सरांच्या व्यक्तिमत्त्वातील आम्हास भावलेले विशेष गुण म्हणजे वेळेचे कटाक्षाने पालन करणे. येणारे प्रसंगाला सामोरे जाणे, सुख आणि दु:ख समसमान मानणे, सततपणे कार्य करण्याची ऊर्मी, सर्वांमध्ये मिसळणे, सतत लेखन करणे,


ISBN-978-93-84801-09-0

संतांचे विचार अंगिकारणे, संशोधनवृत्ती, इतरांना नेहमी प्रेमाणे बोलण्याची लकब, इतरांना वेळोवेळी प्रेरणा देणे, कार्यात किंतू न ठेवता तत्काळ उत्तर शोधणारे म्हणून मी त्यांना पाहिले आहे. सरांनी त्यांच्या कार्याच्या प्रगतीत इतरांना, मित्रांना, सहकार्यांना मोलाचे वाटतात. हे अनेकवेळा त्यांच्या मित्रमंडळीकडून कानावर पडतात. एखादे अमूक अमूक कार्य करावयाचे असेल किंवा प्रवास असेल तर सरांचा जाण्यापासून ते परतीला येईपर्यंत त्यांना करावयाच्या विविध बाबींचे नियोजन तयार करून ठेवतात. त्यामुळे की काय त्यांना ठरवलेले कार्य वेळेत पूर्ण करणे सहजशक्य होत असावे.

सर तुम्ही आयुष्यात नोकरी निमित्त विविध पदेही भूषविली. सर शासनाच्या विविध समित्यांच्या पदावर कार्य केले. तुम्ही सदैव माणसं जोडली, संपर्क वाढविला. कारण जेव्हा केव्हा आपल्याशी संवाद व्हायचा तेव्हा आपण सर्व सहकारी, मित्रांविषयी विचारत होता. खरं तर माणसे जोडणे ही बाब बऱ्याच लोकांना जमत नाही. परंतु आपण त्याची सुंदर गुंफण घातली असे वाटते. सर तुम्ही प्राचार्यपदी असतानाही तुमच्या बोलण्यात नेहमी 'ताई-दादा' इ. सारखे शब्द कायमच असतात. इतरांना तुम्ही कधीही एकेरी संबोधित नाही. नेहमी इतरांना तुम्ही आडनाव ऐवजी नावानेच हाक मारता. आदराने, आस्थेने, प्रेमाने, नात्यानेच बोलता. सर तुमचे व्यक्मित्त्व आदी प्राचार्यपदाला शोभेल व पदाला अधिक उंची प्राप्त करून देणारे असेच आहे.

आपण यापुढेही असेच आनंदीमय, चैतन्यमय राहून इतरांना सदैव प्रेरणा द्याल यात शंका नाही. कारण सोबतीला सौ. करूणा मॅडमचा भक्कम आधार आहे. तुम्हा उभयतांना सुयश चिंतीतो. सर येथे आमच्या लेखनीला मर्यादा घालून विराम देतो. शेवटी सरांविषयी सांगावेसे वाटते, की...

**'' हमे ऐसे गुरू चाहिये । जो हमें अपना मान सके ।**
चल रहो हो उनके छात्र बारीश में। फिर भी उनके आंसुओंको पहचान सकें॥


ISBN-978-93-84801-09-0